**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 15.10.2024** **वार – मंगळवार**

---

**निवडणूक**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक केंद्रिय निवडणूक आयोगानं आज जाहीर केलं. राज्यातल्या सर्व 288 विधानसभा मतदारसंघांमध्ये 20 नोव्हेंबरला एकाच दिवशी मतदान घेतलं जाणार आहे अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. या निवडणुकीची अधिसूचना येत्या 22 तारखेला जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत 29 ऑक्टोबरपर्यंत असेल. विधानसभा निवडणुकीची मतमोजणी 23 नोव्हेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे आज जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद घेणार आहेत.

**खतपुरवठा**

राज्यातल्या रब्बी हंगामासाठी 31 लाख 50 हजार मेट्रिक टन खतांचा पुरवठा मंजूर केल्याची माहिती पुणे कृषी आयुक्तालयानं दिली आहे. रब्बी हंगामातील खतांचा सरासरी वापर 25 लाख मेट्रिक टन इतका असल्याचं लक्षात घेऊन खतांच्या मुबलक पुरवठ्याचं नियोजन केल्याचं आयुक्तालयानं सांगितलं. यंदा पेरण्यांचा टक्का वाढण्याच्या अपेक्षेमुळे अधिक खत विक्री अपेक्षित आहे.

**परिपत्रक**

बेकरी, हॉटेल, ढाबे अशा ठिकाणी कोळसा आणि लाकूड जाळल्यामुळे होणारं वायूप्रदूषण कमी करण्यासाठी स्वच्छ इंधन म्हणून वीजेचा किंवा एलपीजीचा वापर करावा असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेनं दिले आहेत. महापालिकेनं याबाबतचं परिपत्रक काढलं असून इंधन म्हणून लाकडाचा वापर टप्प्याटप्प्यानं बंद करण्यासाठी महापालिका कृती आराखडा तयार करणार आहे.

**गदिमा स्मारक**
आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांच्या पुण्यातल्या स्मारकासाठी 23 कोटी रुपयांची मागणी करणारा प्रस्ताव पुणे महापालिकेनं राज्य सरकारला सादर केला आहे. महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी पत्रकारांना ही माहिती दिली. महापालिकेतर्फे कोथरूड मधल्या महात्मा सोसायटीजवळ या स्मारकाचं काम सुरू असून पहिल्या टप्प्याचं काम पूर्ण होत आलं आहे.

**सत्कार**
समाजहितैषी उद्योजक प्रतापराव पवार यांचा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते आज पुण्यात विविध सामाजिक संस्थांच्या वतीनं कृतज्ञता सन्मान करण्यात आला. समाजहित, दातृत्वाच्या भावनेनं कार्यरत असलेल्या प्रतापराव पवार यांचं योगदान अतुलनीय आणि दिशादर्शक आहे. तंत्रज्ञानाचा सदुपयोग, वेळेचं महत्व आणि सामाजिक जाण असलेलं त्यांचं व्यक्तिमत्व प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार माशेलकर यांनी यावेळी काढले.
या कार्यक्रमाला सहभागी सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

**आंदोलन**
पुरातत्व खात्यामार्फत विविध बौद्ध लेण्यांचं तत्काळ संवर्धन व्हावं या आणि अन्य मागण्यांसाठी आज पुण्यात पाताळेश्वर इथं धरणं आंदोलन आणि निदर्शनं करण्यात आली. बौद्ध अनुयायी या आंदोलनात मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. संवर्धनाबरोबरच बौद्ध लेण्यांच्या ठिकाणी रस्ते, मूलभूत सोई सुविधा आणि पर्यटन मार्गदर्शकांची नेमणूक करावी अशी आंदोलनकर्त्यांची मांगणी आहे.

**टेबल टेनिस**
सांगली इथं झालेल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या शौरेन सोमण यानं 15 आणि 17 वर्षाखालील मुलांच्या दोन्ही गटांत विजेतेपद पटकावलं. 11 वर्षाखालील गटात पुण्याच्या ऋग्वेद दांडेकरला उपविजेतेपद मिळालं.

**बुद्धीबळ**
पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेनं नुकतीच पुणे ज्युनिअर नाईट बुद्धिबळ स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत खुल्या गटात आहान शर्मा,पंधरा वर्षाखालील गटात ध्रुव गांधी, बारा वर्षाखालील गटात आयुष महुरकर तर नऊ वर्षाखालील गटात विहान शर्मा यांनी विजेतेपद पटकावलं. विजेत्यांना रोख रुपये वीस हजार आणि विजेतेपदाचा करंडक प्रदान करण्यात आला.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज कमाल 32 तर किमान 22 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमान असंच असेल. आकाश अंशतः ढगाळ राहील आणि हलक्या स्वरुपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**